आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन; वाराणसी इथं २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं उदघाटन आणि लोकार्पण

- संविधानानं सर्वांना समान संधी देणारी व्यवस्था तयार केल्याचं मुख्यमंत्र्यांचं नागपूरमधे प्रतिपादन

- भारताने रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा भारतानं नाकारला

**आणि**

- युपीआयचा गेल्या महिन्यात १ हजार ९४७ कोटी व्यवहारांसह नवीन विक्रम

**<><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, म्हणजे शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रति असलेल्या सरकारच्या वचनबद्धतेचा वस्तुपाठ असून, गेल्या दशकभरात शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी सरकारने पूर्ण क्षमतेनं काम केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा विसावा हप्ता जारी करताना बोलत होते. या हप्त्या मधून देशभरातल्या ९ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २१ हजार कोटी रुपये थेट हस्तांतरित केले जातील.

प्रधानमंत्री मोदी यांनी आज उत्तरप्रदेशमध्ये वाराणसी इथं सुमारे २ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं उदघाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी 'दिव्यांगजन' आणि वृद्ध लाभार्थ्यांना ७ हजार ४०० सहाय्यक साहित्याचं वितरण केलं. त्यानंतर त्यांनी जनसभेला संबोधित केलं.

सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देऊन ‘व्होकल फॉर लोकल’ला पाठबळ देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**‘होल्ड बाईट’**

प्रधानमंत्री मोदी यांनी आज दालमंडी, लहरतारा-कोटवा, गंगापूर आणि बाबतपूर इथल्या रस्ते सुधारणांसह अनेक नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी केली. शहरातल्या विद्युत पायाभूत सुविधांवर भर देणाऱ्या ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वीज प्रकल्पांचं त्यांनी उदघाटन केलं. यामध्ये स्मार्ट वितरण प्रकल्प आणि ओव्हरहेड इलेक्ट्रिकल केबल्सचं भूमिगतीकरण याचा समावेश आहे.

कर्दमेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार, स्वातंत्र्यसैनिकांचं जन्मस्थान असलेल्या कारखियांव गावाचा विकास, आणि मुन्शी प्रेमचंद यांच्या लमाही इथल्या वडिलोपार्जित घराचं संग्रहालयात परिवर्तन करण्याच्या कामांची प्रधानमंत्री मोदी यांनी आज पायाभरणी केली.

**<><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं देशात समतेचं राज्य निर्माण करण्यासह, सर्वांना समान संधी आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वप्नपूर्तीसाठी व्यवस्था तयार करण्याचं काम केलं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते आज बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला वारसा पुढे नेण्याचं कार्य हे महाविद्यालयानं सातत्यानं करत असून ६ हजाराहून अधिक विद्यार्थी असलेल्या या महाविद्यालयानं हजारो वंचित विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवलं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**---बाईट--- देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री.**

या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते. काही खोल्यांमध्ये सुरु झालेल्या या महाविद्यालयात आज विविध शाखांचं शिक्षण दिलं जात असल्याबद्दल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आनंद व्यक्त केला. बाबासाहेबांनी दिलेला सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा संदेश आचरणात आण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

ग्रँडमास्टर दिव्या देशमुखनं बुद्धिबळ या खेळातलं चीनचं वर्चस्व मोडीत काढलं याबद्दल एक भारतीय म्हणून तिचा अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. फिडे विश्वचषक महिला बुद्धिबळ विजेती दिव्या देशमुख हिचा आज नागपूर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातल्या कन्येनं इतक्या कमी वयात भारताचं नाव उज्ज्वल केलं हे पाहून आनंद झाल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

राज्यातल्या खासगी बाजार समित्यांना दिलेल्या वनटाईम परवान्यांबाबत पुनर्विचार सुरु असून, केवळ शेतकऱ्यांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करणाऱ्या खासगी बाजार समित्यांच्या परवान्यांचं नूतनीकरण केलं जाईल, असं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी म्हटलं आहे. ते आज नंदुरबारमध्ये वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातल्या ३०५ बाजार समित्यांपैकी केवळ शंभर बाजार समित्यांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत. हे लक्षात घेता, आंतरराष्ट्रीय अथवा बाह्य मार्गाने निधी उभारून सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल, असं ते यावेळी म्हणाले. आगामी काळात  एक तालुका एक बाजार समिती' हे सरकारचं धोरण राहील, असं ते म्हणाले.

<><><><>

भारतानं रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा भारतानं आज नाकारला आहे. भारतानं रशियाकडून तेल खरेदी थांबवली नाही असं भारतानं स्पष्ट केलं. राष्ट्रीय हित आणि बाजार याला अनुसरून भारत इंधन खरेदी करत असतो, भारतीय तेल कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी थांबवल्याची माहिती आपल्याकडे नाही, असं सरकारनं म्हटलं आहे.

दरम्यान, भारत आणि रशियाचे संबंध हे काळाच्या कसोटीवर उतरल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल म्हटलं.

<><><><>

भारताच्या डिजिटल पेमेंटचा आधार असलेल्या युपीआय, म्हणजेच  युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसनं  जुलै २०२५ मध्ये १ हजार ९४७ कोटी व्यवहारांसह एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. या व्यवहारांची एकूण रक्कम तब्बल २५ लाख १० हजार कोटी रुपये

इतकी आहे. ही आकडेवारी युपीआयद्वारे केलेल्या व्यवहारांमध्ये वर्षाला ३५ टक्के, तर व्यवहार मूल्यात २२ टक्के वाढ दर्शवत असून, डिजिटल पेमेंट परिसंस्थेतलं युपीआय चं वर्चस्व अधोरेखित करत आहे.

**<><><><>**

मत्स्यशेतीला राज्य सरकारनं कृषीचा दर्जा दिला आहे. त्याप्रमाणे भारत सरकारकडूनही मत्स्यशेतीला कृषीचा दर्जा मिळावा तसंच प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा लाभ मच्छीमारांना मिळावा, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. मुंबईतल्या वर्सोवा इथं केंद्रीय मत्स्य शिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजित पी एम किसान सन्मान निधी वितरण कार्यक्रमात ते दृकश्राव्य माध्यमातून बोलत होते.

**<><><><>**

निवडणूक आयोगानं मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचं मानधन दुप्पट केलं आहे. मतदार याद्या तयार करून अद्ययावत करण्यात सहभागी असलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षकांच्या मानधनातही वाढ करण्यात आली आहे. सुधारित मानधन रचनेनुसार हे मानधन सहा हजार रुपयांवरून बारा हजार रुपये झालं आहे. तसंच मतदार याद्या तयार करून अद्ययावत करण्यासाठी त्यांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहन भत्त्यात एक हजार रुपयांवरून दोन हजार रुपये अशी वाढ झाली आहे. केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षकांच्या मानधनात बारा हजार रुपयांवरून अठरा हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. निवडणूक आयोगानं सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी यांना २५ हजार आणि सहाय्यक रिटर्निंग अधिकारी यांच्यासाठी ३० हजार रुपये मानधनाची तरतूदही केली आहे.

**<><><><>**

रत्नागिरी पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेनं सापळा रचून केलेल्या कारवाईत अडीच किलो वजनाची, अडीच कोटी रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या पदार्थाची विक्री करण्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

**<><><><>**

मुंबई आयआयटीमधल्या एका २२ वर्षीय विद्यार्थ्याने आज पहाटे वसतिगृहाच्या इमारतीवरून उडी मारून आपलं जीवन संपवलं.  हा विद्यार्थी नवी दिल्लीचा रहिवासी होता, आयआयटी मधे तो धातुकर्म अभियांत्रिकी आणि पदार्थ विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता. याप्रकरणी पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

**<><><><>**

अकोला शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनच्या नवीन इमारतीचं लोकार्पण आज करण्यात आलं.  सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते  हे लोकार्पण झालं.

**//<><><><>//**